- निवासी फ्लॅट चे काम सुरु झाल्यानंतर एकुण किंमतीच्या २५% रक्कम
- निवासी फ्लॅट चे स्लॅब चे काम पुर्ण झाल्यानंतर एकुण किंमतीच्या २५% रक्कम
- निवासी फ्लॅट चे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर मोक्यावरील क्षेत्रफळ व ठरलेला दर ह्याप्रमाणे निवासी गाळा तुम्हास मोजून मापून तुम्ही मला उर्वरीत रक्कम खरेदीखताचे वेळेस देण्याचे ठरले आहे.

सदर निवासी फ्लॅट मी तुम्हास खालील शर्ती व अटींवर विकण्याचा सौदा केला आहे व त्या शर्ती व अटी तुम्ही मान्य केल्या असून त्या तुम्हास लागू व बंधनकारक राहतील.

## * शर्ती व अटी *

१) कॉम्पलेक्स चे बांधकाम आर.सी.सी. पध्दतीचे राहील.

२) निवासी फ्लॅट ची उंची १० फुट राहील. छतावर बांधकाम करण्याचा मला पुर्ण हक्क व अधिकार राहील.

३) सदर निवासी गाळ्याची आंतील भिंत ४.५ इंच जाडीची व बाहेरील ९ इंच जाडीची राहील.

४) निवासी गाळ्याचे इले. फिटींग हे कंसील्ड स्वरुपाचे उच्च प्रतीच्या आय.एस.आय. मार्क वायरांनी करुन देण्यांत येईल व गाळ्यामध्ये सुबक सुंदर विद्युत बटन/स्विचेस व आवश्यक त्या ठिकाणी लवून देण्यांत येतील. हॉलमध्ये टी.व्ही. पॉईन्ट आणि हॉल व मास्टर बेडरुमध्ये एस.सी. पॉईंट घेवून देण्यांत येईल.

५) निवासी फ्लॅट मध्ये इले. फिटींग त्याचे पॉईंट पर्यंत करुन देण्यांत येईल आणि ज्या ठिकाणी मिटर करीता जागा सोडलेली आहे त्या ठिकाणावरुनच तुमचे निवासी फ्लॅट पर्यंत वायर फिटींग करुन देण्यांत येईल. वरील निवासी गाळ्याकरीता विज पुरवठा हा तुम्ही स्वतंत्रपणे तुमचे खर्चाने विजेचे मिटर घेवून करावा असा करार आहे. म्हणजेच त्याचा येणारा संपुर्ण खर्च हा तुम्हास करावयाचा आहे.

६) निवासी गाळ्याचे हॉल ला पी.ओ.पी. करुन त्यामध्ये आम्ही तुम्हास एल.ई.डी. लाईटस् लावून देवू.

७) पुर्ण निवासी गाळ्याचे फ्लोअरींग हे व्हेट्रीफाईड टाईल्स मध्ये करुन देण्यांत येईल.

८) किचन मध्ये ग्रेनाईट चा प्लेटफॉर्म करुन देण्यांत येईल व एस.एस. सिंक बसवून देण्यांत येईल. किचन मध्ये ओटयाचे वर सज्जाचे लेव्हलपर्यंत टाईल्स लावून देण्यांत येतील.